# प्रकरण पहिले

## कवठे महांकाळ तालुक्यातील भौगोलिक, आर्थिक, सामाजिक स्थिती

### १.१ कवठे महांकाळ तालुक्याचे स्थान आणि विस्तार -

महाराष्ट्रातील सांगली जिल्हयातील हा एक महत्वाचा तालुका असून, ५३ खेडयांनी तो तयार झालेला आहे या तालुक्याने ९२,३५१.६८ हेक्टर क्षेत्र व्यापलेले आहे. या तालुक्याचा रेखावृत्तीय विस्तार ७४$^{0}$ पूर्व ते ७५.४५$^{0}$ पूर्व असून अक्षवृत्तीय विस्तार १६.५५$^{0}$ उत्तर ते १७.५०$^{0}$ उत्तर असा आहे. कवठे महांकाळ तालुका सांगलीच्या पूर्वेस ५५ किलोमीटर अंतरावर वसलेला आहे.

### १.२ प्राकृतिक रचना व नदीप्रणाली -

कवठे महांकाळ तालुक्यात अग्नीजन्य खडकांनीयुक्त अशी कमी जास्त उंचीची तांबूस काळया प्रकारची जमीन आढळते. या तालुक्यातील प्रदेशात पूर्व-पश्चिम आणि दक्षिण ते पूर्व-पश्चिम या दिशात स्थानिक टेकडया आहेत. या टेकडयांवर कमी जास्त खोलीची दगड खडकांनी युक्त वेगवेगळया रंगाची जमीन आढळते. तसेच या टेकडयांवर खुरटया वनस्पतीचे अच्छादन आढळते, लगेच टेकडयांना लागून त्यांच्या पायथ्याशी कमी जास्त खोलीची तांबडया रंगाची जमीन आढळते. टेकडयांच्या पायथ्यापासून जसजसे वरच्या भागाकडे येऊ तसतशी जमीनीची खोली वाढत जाते. तेथून पुढे पठारी भागामध्ये काळी व मंद उताराची जास्त खोलीची जमीन आढळते. अग्रणी नदी खो-यात गाळाची लोमयुक्त व जास्त खोलीची जमीन आढळते.

कवठे महांकाळ तालुक्याची प्राकृतिक रचना जास्त गुंतागुंतीची नाही. पठारी भागावर मंद ते मध्यम उतार आढळतो. मात्र स्थानिक टेकडयांच्या भागात उताराची तीव्रता जास्त आढळते. कवठे महांकाळ तालुक्यातील

जास्तीत जास्त उंचीचे ठिकाण ८५५ मीटरवर असून कमीत कमी उंचीचे ठिकाण अग्रणी नदी खो-यात ५६५ मीटरवर आहे. म्हणजेच कवठे महांकाळ तालुक्यातील भूप्रदेशाचा उतार टक्केवारीमध्ये ७.५ % आहे. तालुक्याच्या उत्तर भागामध्ये उताराची दिशा वायव्येकडून ईशान्येकडे आहे. मध्यवर्ती भागाचा उतार उत्तर दक्षिण आहे. तर दक्षिण भागामध्ये उताराची दिशा दक्षिण उत्तर आहे.

कवठे महांकाळ तालुक्यात एकमेव पण महत्वाची अग्रणी ही नदी आहे. हिचा उगम खानापूर तालुक्यातील ऐनवाडी येथील अगस्तीऋषीच्या मंदीरापासून झालेला आहे. या नदीच्या प्रवाहाची दिशा पश्चिमेकडून पूर्वेकडे असून ही नदी कवठे महांकाळ तालुक्याच्या मध्यभाग, दक्षिणभाग या प्रदेशातून पुढे जाते व ती कर्नाटकात कृष्णा नदीस मिळते.

## १.३ हवामान व पर्जन्यमान -

कवठे महांकाळ तालुक्याचे हवामान समशितोष्ण मान्सून प्रकारामध्ये मोडते. या तालुक्यात हिवाळा मध्यम तर उन्हाळा अतिशय कडक असतो. या तालुक्यातील सरासरी वार्षिक पर्जन्यमान ५५३.२७ मिली मीटर असून एकूण पडणा-या पावसापैकी ६७.७ % पाऊस जुलै ते ऑक्टोंबर या महिन्याच्या दरम्यान पडतो. मुख्यत: हा पाऊस नैऋत्य मोसमी वा-यापासून पडतो. हे पावसाचे प्रमाण कमी असल्याने हा तालुका दुष्काळी भाग म्हणून ओळखला जातो.

कवठे महांकाळ तालुक्यातील सरासरी वार्षिक तपमान २५.४$^0$ सेंटीग्रेड आहे. उन्हाळ्यामध्ये हे तपमान ३८$^0$ सेंटीग्रेड असते. तर हिवाळ्यात १५.९$^0$ सेंटीग्रेड असते.

## १.४ लोकसंख्या -

१९८१ च्या शिरगणतीनुसार कवठे महांकाळ तालुक्यातील एकूण लोकसंख्या

९७,२७४ इतकी असून त्यापैकी ४८,९७७ पुरुष आणि ४८,२९७ स्त्रिया आहेत. या तालुक्यातील लोकसंख्येची घनता दर चौ. कि.मी. ला १३८ इतकी आहे. स्त्रीपुरुषाच्या संख्येवरून असे दिसून येते की, दर १००० पुरुषामागे ९८६ स्त्रिया असे या तालुक्यातील स्त्री पुरुष प्रमाण पडते.

## १.५ लोकसंख्येनुसार खेडयांचे वर्गीकरण –

२०० पेक्षा कमी लोकसंख्या असणारे एकही खेडे कवठे महांकाळ तालुक्यात नाही. २०० ते ४९९ लोकसंख्या असणारी ६ खेडी या तालुक्यात असून तेथील एकूण लोकसंख्या २२८२ आहे. त्यापैकी १,१५९ पुरुष व १,१२३ स्त्रि-या आहेत.

५०० ते ९९९ लोकसंख्या असणारी १२ खेडी असून तेथील एकूण लोकसंख्या ८८५५ आहे व त्यापैकी ४,३३९ पुरुष व ४,५१६ स्त्रिया आहेत.

१००० ते १९९९ लोकसंख्या असणारी १८ खेडी असून तेथील एकूण लोकसंख्या २६,१०० आहे. त्यापैकी १३,०७६ पुरुष व १३,०२४ स्त्रि-या आहेत.

२००० ते ४९९९ लोकसंख्या असणारी १६ खेडी असून तेथील एकूण लोकसंख्या ५०,२३६ आहे त्यापैकी २५,१९१ पुरुष व २५,०४५ स्त्रि-या आहेत.

५००० ते ९९९९लोकसंख्या असणारे या तालुक्यात कवठे महांकाळ हे एकच गांव असून तेथील एकूण लोकसंख्या ९८०१ आहे. त्यापैकी ५२१२ पुरुष व ४५८९ स्त्रि-या आहेत. १०,००० व त्यापेक्षा अधिक लोकसंख्या असणारे एकही गांव कवठे महांकाळ तालुक्यात नाही.

## १.६ तालुक्यातील घरे व कुंटूबे –

कवठे महांकाळ तालुक्यात राहत्या घरांची संख्या १७,०२२ इतकी असून या घरामधून १७,४२६ इतकी कुंटूबे राहतात. घरे नसणा-या कुंटूबाची संख्या २१५

असून या कुटुंबातील लोकांची संख्या ७३५ असून त्यापैकी ३८१ पुरुष व ३५४ स्त्रिया आहेत.

## १.७ साक्षरतेचे प्रमाण -

कवठे महांकाळ तालुक्यातील एकूण लोकसंख्येपैकी [९७,२७४] ४०,८८२ लोक साक्षर आहेत. म्हणजे एकूण लोकसंख्येपैकी ४२.०३ टक्के लोक साक्षर आहेत. एकूण ४८,९७७ पुरुषांपैकी २७,२५० म्हणजे ५५.६४ टक्के पुरुष साक्षर आहेत. तर एकूण ४८,२९७ स्त्रियांपैकी १३,६३२ म्हणजे २८.२३ टक्के स्त्रिया साक्षर आहेत.

## १.८ कामगारांची संख्या -

कवठे महांकाळ तालुक्यातील एकूण लोकसंख्येपैकी ३२,४६३ म्हणजे ३३.३७ टक्के एकूण कामगार[त्यात हंगामी कामगारांचा समावेश नाही] आहेत. यापैकी २४,९१९ पुरुष [एकूण पुरुषांपैकी ५०.८८ %] आणि ४,५४४ स्त्री [एकूण स्त्रियांपैकी १५.६२ %] कामगार आहेत.

एकूण कामगारांपैकी शेतकरी कामगारांची संख्या १८,८१४ असून त्यापैकी १४,९५५ पुरुष आणि ३,८५९ स्त्री शेतकरी कामगार आहेत.

एकूण शेतमजूरांची संख्या ७,४२० आहे. त्यापैकी ४,४१५ पुरुष आणि ३००५ स्त्री शेतमजूर आहेत.

कुटीर उद्योगांत काम करणारे, घरगुती स्वरूपात वस्तूंची निर्मिती करणारे, प्रक्रिया करणारे, दुरुस्ती करणारे इत्यादी कामगारांची संख्या ८५१ आहे. त्यापैकी ६६७ पुरुष व १८४ स्त्री कामगार आहेत.

वरील व्यवसायाव्यतिरिक्त इतर व्यवसायात गुंतलेल्या कामगारांची संख्या ५३७८ इतकी आहे. त्यापैकी ४८८२ पुरुष आणि ४९६ स्त्री कामगार आहेत.

याबरोबरच एकूण लोकसंख्येपैकी हंगामी कामगारांची संख्या ७९६७ म्हणजे ८.१९ टक्के इतकी आहे. त्यापैकी ९८७ पुरुष [एकूण पुरुषापैकी २.०१ %] कामगार आणि ६९८० स्त्री [एकूण स्त्रियांपैकी १४.४५ %] कामगार आहेत.

या वरील सर्व कामगारावर अवलंबून असणारी लोकसंख्या ५६,८४४ [एकूण लोकसंख्येपैकी ५८.४४ %] आहे. त्यापैकी २३,०७१ पुरुष [एकूण पुरुषापैकी ४७.११ %] आणि ३३,७७३ [एकूण स्त्रियांपैकी ६९.९३ %] स्त्रिया आहेत.

१.९. कवठे महांकाळ तालुक्यात उपलब्ध असणा-या विविध सुविधा .-

कवठे महांकाळ तालुक्यातील एकूण गांवापैकी किती गांवांना व किती लोकसंख्येला अत्यावश्यक असणा-या मुलभूत सुविधा उपलब्ध आहेत त्याचे प्रमाण काय आहे. याची कल्पना पुढील वर्णनावरुन येईल.

१.९ अ- शिक्षण

कवठे महांकाळ तालुक्यात शिक्षणाच्या विविध सोयी उपलब्ध असलेल्या दिसून येतात. या तालुक्यातील सर्व खेडयांतून शिक्षणाची सोय उपलब्ध झाली असल्याने त्याचा लाभ १०० % जनतेला होत आहे. शिक्षणाच्या ज्या विविध सोयी आहेत त्यापैकी ५३ खेडयातून ७९ पूर्व प्राथमिक शाळा आहेत. ३४ खेडयांतून ५० प्राथमिक शाळा आहेत. ८ खेडयांतून ८ हायस्कूल किंवा माध्यमिक शाळा आहेत. तर २ खेडयात २ कनिष्ठ महाविद्यालये आहेत तर एका गांवात एक कनिष्ट आणि वरिष्ट असे महाविद्यालय आहे. आणि ५ खेडयांतून ६ प्रौढशिक्षण केंद्रे आहेत.

१.९ ब - वैद्यकीय सोयी -

कवठे महाकांळ तालुक्यातील एकूण खेडयांपैकी १५ खेडयांतून म्हणजे २८.३० % खेडयांतून वैद्यकीय सोयी उपलब्ध असलेल्या दिसतात व या वैद्यकीय सोयीचा लाभ एकूण लोकसंख्येपैकी ५०,३७६ म्हणजे ५१.७९ % लोक घेत आहेत.

...

आरोग्य विषयक ज्या विविध सोयी आहेत. त्यापैकी तालुक्यातील २ खेडयात २ दवाखाने आहेत. एका खेडयात एक प्रसूती व बालकल्याण केंद्र आणि प्रसूतीगृहाची सोय आहे, ८ खेडयात ८ आरोग्य व प्राथमिक आरोग्य केंद्रे आहे. ९ खेडयात ९ औषधालये आहेत तसेच ९ खेडयात ९ कुटूंबनियोजन केंद्राची सोय आहे. त्याच बरोबर १० खेडयांमधून २२ खाजगी दवाखाने आहेत.

१.९ क – पिण्याच्या पाण्याच्या सोयी –

तालुक्यातील सर्व खेडयांतून पिण्याच्या पाण्याची सोय करण्याचा प्रयत्न केलेला आहे. काही खेडयामधून विहीरी, बंधारा, कुपनलीका, नद्या यांच्या माध्यमातून पिण्याच्या पाण्याची सोय झालेली आहे. तर ज्या खेडयांत पाण्याची टंचाई आहे त्याठिकाणी टॅन्करच्या सहाय्याने पाणी पुरवठा केलेला आहे.

१.९ ड – टपाल व तार –

कवठे महांकाळ तालुक्यातील एकूण खेडयांपैकी ३६ खेडयांना म्हणजे ६७.९२ टक्के खेडयांना आणि एकूण लोकसंख्येपैकी ८३,९७३ लोकांना म्हणजे ८६.३३ टक्के लोकांना टपाल व तार सेवा उपलब्ध झालेल्या आहेत यामध्ये ३३ खेडयात टपाल कचे-या आहेत. एका खेडयात टपाल कचेरी व फोनची सोय आहे तर दोन खेडयात टपाल व तार कचे-या आणि फोनची सोय आहे.

१.९ इ – बाजारांची सोय –

कवठे महांकाळ तालुक्यातील एकूण खेडयांपैकी १३ खेडयांत [२४.५३ %] बाजारांची सोय उपलब्ध आहे. व या बाजारांचा लाभ तालुक्यातील एकूण लोकसंख्येपैकी ४५,६७६ लोकांना [४६.९६ %] होतो.

१.९ फ – वाहतुकीची सोय –

कवठे महांकाळ तालुक्यातील एकूण खेडयापैकी ४७ खेडयांत [८८.६८ %]

वाहतुकीची सोय उपलब्ध आहे. या वाहतुकीच्या सोयीचा लाभ तालुक्यातील एकूण लोकसंख्येपैकी १४,०६४ [१६.७० %] लोक घेत आहेत. ४७ खेडयांत बस थांब्याची सोय आहे. तरी ४ खेडयांत रेल्वे स्टेशन आहेत.

### १.९ ज – पक्क्या रस्त्याशी संलग्न असणारी खेडी –

कवठे महांकाळ तालुक्यातील एकूण खेडयांपैकी २० खेडी [३७.७४ %] पक्क्या रस्त्याशी जोडली गेलेली आहेत. यांचा एकूण लोकसंख्येपैकी ४४,१९२ [४५.४३ %] लोकांना लाभ होत आहे.

### १.९. ह – विद्युत पुरवठा –

कवठे महांकाळ तालुक्यातील ४७ खेडयात [८८.६८ %] विद्युतीकरण झालेले आहे व या विद्युत पुरवठयाच्या सोयीचा लाभ एकूण लोकसंख्येपैकी ९४,०९९ लोकांना [९६.७४ %] मिळत आहे. मात्र या तालुक्यातील ६ खेडयात अद्याप विद्युतीकरण झालेले नाही. [१९८१ नंतर याही ६ खेड्यांचे विद्युतीकरण झालेले आहे.]

### १.९ ल – प्रशासकीय सोयी –

तालुक्यातील शांतता व संरक्षणासाठी एका पोलीस स्टेशनची आणि एका औट पोष्ट पोलीस स्टेशनची सोय निर्माण केलेली आहे. तसेच पंचायत समिती कार्यालयाची व तहसिलदार कार्यालयाची कवठे महांकाळ येथे सोय आहे.

### १.१० जमीनीचा वापर –

कवठे महांकाळ तालुक्यातील एकूण क्षेत्र ९२,३५१.६८ हेक्टर असून त्यापैकी १६२५.१३ हेक्टर क्षेत्र जंगलाने व्यापलेले आहे. तर एकूण क्षेत्रापैकी ६३.३३ टक्के क्षेत्र लागवडीस योग्य आहे. लागवडी योग्य क्षेत्रापैकी ११.२९ टक्के म्हणजे

६६०३.२४ हेक्टर क्षेत्र बागायती आहे. त्यापैकी ७० हेक्टर क्षेत्र सरकारी कालवा, ३,६३७.३१ हेक्टर क्षेत्र वीजपुरवठा नसलेल्या विहिरी, २५२४.८३ हेक्टर क्षेत्र वीज पुरवठा असलेल्या विहीरी, १६० हेक्टर क्षेत्र तलाव आणि २११.१० हेक्टर क्षेत्र इतर साधनांच्या साहयाने बागायती करण्यात आलेले आहे.

एकूण क्षेत्रापैकी ४७,६५४.०५ हेक्टर क्षेत्र कोरडवाहू आहे. ४२३१.७८ हेक्टर क्षेत्र लागवडीस योग्य पण पडीक आहे. तर ३२,२३७.४८ हेक्टर क्षेत्र लागवडीस योग्य नाही.

## १.११ सहकारी क्षेत्र -

कवठे महांकाळ तालुक्यात सहकाराचा विविध क्षेत्रामध्ये विकास झालेला दिसून येतो. १९८२-८३ ते १९८७-८८ ची कवठे महांकाळ तालुक्यातील सहकारी संस्थांची आकडेवारी लक्षात घेता सहकारी संस्थांची विविध क्षेत्रात कशी प्रगती होत गेलेली आहे. ते तक्ता क्रमांक १.१ वरून दिसून येते.

१९८२-८३ साली कवठे महांकाळ तालुक्यात १४० एकूण सहकारी संस्था होत्या. त्यामध्ये वाढ होऊन १९८७-८८ मध्ये १७१ एकूण सहकारी संस्था झाल्या. १९८२-८३ ची सहकारी संस्थांची संख्या लक्षात घेता १९८७-८८ मध्ये सहकारी संस्थांच्या संख्येत २२.१४ टक्केने वाढ झालेली दिसून येते.

## तक्ता क्रमांक १.१

### कवठे महांकाळ तालुक्यातील एकूण सहकारी संस्थांची प्रगती १९८२-८३ ते १९८७-८८

| अ.नं. | संस्थांचा प्रकार | ८२-८३ | ८३-८४ | ८४-८५ | ८५-८६ | ८७-८८ |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | शेती पतपुरवठा संस्था | ३८ | ३८ | ३९ | ३९ | ३९ |
| २. | नागरी पतपुरवठा संस्था | ८ | १० | १० | १२ | १२ |
| ३. | पगारदार पतपुरवठा संस्था | १ | १ | २ | ४ | ३ |
| ४. | तालुका खरेदी विक्री संघ | १ | १ | १ | १ | १ |
| ५. | साखर कारखाना | १ | १ | १ | १ | १ |
| ६. | विणकर संस्था | २ | २ | २ | २ | २ |
| ७. | चर्मकार संस्था | १ | १ | १ | १ | १ |
| ८. | बलुतेदार ग्रामोद्योग संघ | १ | १ | १ | १ | १ |
| ९. | मच्छीमार संस्था | - | - | १ | १ | २ |
| १०. | कुक्कुटपालन | - | १ | १ | १ | ४ |
| ११. | शेती संस्था | २ | ३ | ४ | ४ | ५ |
| १२. | पाणीपुरवठा संस्था | २० | २२ | २२ | २२ | १३ |
| १३. | मध्यवर्ती ग्राहक संस्था | - | - | - | १ | १ |
| १४. | प्राथमिक ग्राहक संस्था | १ | ३ | ३ | ४ | ४ |
| १५. | गृहनिर्माण संस्था | ४ | ५ | ५ | ५ | ४ |
| १६. | महिला औद्योगिक संस्था | - | - | - | १ | १ |
| १७. | मजूर संस्था | १५ | १५ | १६ | १६ | १६ |
| १८. | दूध संस्था | ४४ | ४७ | ४९ | ६० | ६० |
| १९. | दूध संघ | १ | १ | १ | १ | १ |
| | एकूण सहकारी संस्था | १४० | १५२ | १५९ | १७७ | १७१ |

आधार : सांगली जिल्हयातील सहकारी संस्था -

सांख्यकीय विवरण पुस्तिका १९८२-८३ ते १९८७-८८ च्या सर्व पुस्तिका

प्रकाशक : सांगली जिल्हा सहकारी बोर्ड लि., सांगली.

## आ धा र

१] सर्व्हे ऑफ इंडिया टोपोशीट नं. ४७ के/१६.

२] सीसीओ इकॉनॉमिक ॲबस्ट्रक्ट ऑफ सांगली डिस्ट्रीक्ट १९८१

३] डिस्ट्रीक्ट सेन्सस हॅन्ड बुक सांगली १९८१.

---